# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड  जा.क्र. 191/2024  दिनांक : 31.05.2024

## 1)चोरी :–

**वजिराबाद :–** दिनांक 27.05.2024 रोजी चे 09.00 वा. चे सुमारास, **मिनी बसस्थानक नांदेड येथे**, यातील फिर्यादी हे आधार हॉस्पीटल येथुन डॉ योगेश कुंटलवाड यांचे हॉस्पीटल चिरायु न्युरो हॉस्पीटल डॉक्टर प्लाझा डॉ लेन नांदेड येथे ॲटो क्रमांक एमएच–26/एन–3902 मध्ये बसुन येत असतांना सदर ॲटो चालक व त्याच्या सोबतचे इतर दोन साथीदार यांनी संगणमत करून ॲटोमध्ये गर्दीचा बहाना करून फिर्यादीची नजर चुकवुन त्यांचे खिशातील नगदी 10,000/–रूपये चोरून घेतले. व फिर्यादीस हॉस्पीटलला न सोडवता मिनी बसस्थानक येथे सोडुन पळुन गेले. फिर्यादीचे मुलीची तब्येत ठिक नसल्याने म्हैसा येथील दवाखान्यात उपचार घेवुन तब्येत बरी झाल्याने, उशिरा तक्रार दिल्याने गुन्हा दाखल. वगैरे **फिर्यादी जयवंत श्रावण चव्हाण, वय 51 वर्षे, व्यवसाय शेती रा. कासारपेठ तांडा देवठाणा ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 240/2024 कलम 379, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/11 सोनटक्के, मो.क्रं. 8805007511** हे करीत आहेत.

## 2)अवैध रेती चोरी :–

**1)सिंदखेड :–** दिनांक 30.05.2024 रोजी चे 14.50 ते 15.30 वा. चे दरम्यान, **मौ. उमरागाव ते मनीरामथड गावा जवळ ता. माहुर जि. नांदेड येथे**, यातील नमुद दोन आरोपीतांने सगनमत करून बिना परवाना बेकायदेशिररीत्या दोन ब्रास वाळु किंमती 8,000/–रू ची चोरी करून टिप्पर मध्ये भरून चोरटी विक्री करण्याचे उदेशाने वाहतुक करीत असतांना मिळुन आले. वगैरे **फिर्यादी सपोनि/श्री सुशांत गणपत किनगे, ने. पोस्टे सिंदखेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे सिंदखेड** गुरनं 49/2024 कलम 379, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री रमेश गीरी, मो.क्रं. 9850988371** हे करीत आहेत.

**2)बिलोली :–** दिनांक 30.05.2024 रोजी चे 14.40 वा. चे सुमारास, **बडुर फाटा येसगी ते नांदेड रोडवर बिलोली ता. बिलोली जि. नांदेड येथे**, यातील नमुद दोन आरोपीतांनी सगनमत करून बिना परवाना बेकायदेशिररीत्या मांजरा नदीतील आठ ब्रास लाल रेती किंमती 24,000/–रू ची ट्रक क्रमांक एमएच–26/एडी–7586 मध्ये भरून चोरटी विक्री करण्याचे उदेशाने वाहतुक करीत असतांना मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/1722 1722, लक्ष्मण बाबन्ना बच्वेवार, ने. पोस्टे बिलोली** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बिलोली** गुरनं 84/2024 कलम 379, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2351 श्री मुदेमवार, मो.क्रं. 9049778709** हे करीत आहेत.

**3)देगलुर :–** दिनांक 30.05.2024 रोजी चे 14.35 वा. चे सुमारास, **आरटीओ पोस्ट जवळ देगलुर ता. देगलुर जि. नांदेड येथे**, यातील नमुद दोन आरोपीतांनी सगनमत करून बिना परवाना बेकायदेशिररीत्या दोन ब्रास लाल रेती किंमती 5,000/–रू चा ट्रॅक्टर मध्ये भरून चोरटी विक्री करण्याचे उदेशाने वाहतुक करीत असतांना मिळुन आले. वगैरे **फिर्यादी आब्दुल वाजीद आब्दुल वाहीद, ने. पोस्टे देगलुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरनं 223/2024 कलम 379, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2822 कनकवळे, मो.क्रं. 9637465966** हे करीत आहेत.

## 3)गंभीर दुखापत :–

**उमरी :–**दिनांक 29.05.2024 रोजी चे सकाळी 06.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे राहाते घरी मौ. इज्जतगाव आबादी ता. उमरी जि. नांदेड येथे**, यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून लिंबाच्या झाडाचे जळतंन टाकण्याच्या कारणावरून फिर्यादीचे दात काढुन त्यांना व साक्षीदार यास जर परत आमच्याशी वाद केला तर तुला व तुझ्या कुटूंबाला खतम करतो अशी धमकी दिली. वगैरे **फिर्यादी प्रकाश तुकाराम ढगे, वय 50 वर्षे, व्यवसाय शेती रा. इज्जतगाव आबादी ता. उमरी जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे उमरी** गुरन 167/2024 कलम 325, 323, 504, 506, 34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2336 जाधव, मो. नं. 9421841380** हे करीत आहेत.

## 4)खंडणी :-

**शिवाजीनगर :-**दिनांक 21.12.2021 रोजी चे 00.00 ते दिनांक 22.05.2024 चे 00.00 चे दरम्यान, **उमंग हॉस्पीटल विष्णुनगर नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस मागील अडीच वर्षापासुन ते दिनांक 22.05.2024 पर्यंत उमंग हॉस्पीटल विष्णुनगर नांदेड येथे फिर्यादी व फिर्यादीच्या वडीलांनी त्यांच्या हॉस्पीटलचे बांधकामाच्या बाजुची चार पाच फुट जागा गाडी पार्कींग साठी दया म्हणुन धमकावुन विविध प्रकारे त्रास देवुन बांधकाम बंद करा अन्यथा खंडणी म्हणुन ठेकेदार यांचे मार्फत साडे सहा लाख रूपये मागितले व स्विकारले तसेच सदर वादविवादातील कोर्टातील एक केस मागे घेण्यासाठी पाच लाख रूपये घेतले आहेत. तसेच फिर्यादीस व वडीलास व इतर बांधकामावरील मिस्त्री, गुत्तेदारास बांधकाम बंद करणेसाठी धमकावुन वेळोवेळी खंडणी मागुन, न दिल्यास जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी डॉ. रविंद्र भुमन्ना नराड, वय 37 वर्षे, व्यवसाय डॉक्टर रा. बीएमसी कॉलनी नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 184/2024 कलम 384, 506, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री कव्हाळे, मो.क्रं. 9422612711** हे करीत आहेत.

## 5)जिवन आवश्यक वस्तु कायदा (ई सी ॲक्ट):-

**इस्लापुर :-** दिनांक 30.05.2024 रोजीचे सायंकाळी 05.40 वा. चे सुमारास, **इस्लापुर ते शिवनी जाणारे रोडवर देविदास पांडुरंग मेंडके यांच्या घराजवळ मौ. कुपटी ता. किनवट जि. नांदेड येथे** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून बिना परवाना बेकायदेशिररीत्या विवीध कंपणीचे रासायनीक खते वेगवेगळया वाहनांमध्ये भरून शेतकऱ्यांना विक्री करीत असतांना किंमती 30,47,250/-रू चे मुद्येमालासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी बालाजी बाबुराव मुंडे, व्यवसाय नौकरी गुणवंता गुणनियंत्रण निरीक्षक तथा तालुका कृषी अधिकारी किनवट,** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इस्लापुर** गुरनं 48/2024 कलम नियंत्रण आदेंश 1985 मधील 19(सी) व अत्यावश्यक वस्तु अधिनियम 1955 चे कलम 3(2)(1) 7 उल्लंघन कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री उमेश भोसले, मो.क्रं. 9552591244** हे करीत आहेत.

## 6)भारतीय हत्यार कायदा :-

**इतवारा :-**दिनांक 30.05.2024 रोजी चे 14.30 वा. चे सुमारास, **शांतीनगर येथील समाज मंदिराच्या समोरील मोकळया जागेवर नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकादेशीररीत्या आपले ताब्यामध्ये एक लोखंडी तलवार बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोउपनि/श्री देविदास बापुराव बिसाडे, ने. पोस्टे इतवारा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इतवारा** गुरनं 188/2024 कलम 4/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2306 श्री चंचलवाड, मो.क्रं. 9730192361** हे करीत आहेत.

## 7)जुगार :-

**अर्धापुर :-** दिनांक 30.05.2024 रोजी चे 19.05 वा. चे सुमारास, **बाळु नामदेव लोणे यांचे चेनापुर शिवारात लिंबाचे झाडाखाली मौ. चेनापुर ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकादेशीररीत्या अंदर बाहर नावाचा जुगार खेळत व खेळवीत असताना नगदी 56,750/-रूपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोना/विजय रामराव कदम, ने. पोस्टे अर्धापुर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 265/2024 कलम 12 (अ) म.जु.का. प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2544 आनेबोईनवाड, मो.नं. 9529971005** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड

# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 192/2024 दिनांक : 31.05.2024**

पोलीस अधिक्षक कार्यालयात **"अहिल्यादेवी होळकर "** यांची जयंती साजरी

31 मे, 2024 शुक्रवार रोजी **"अहिल्यादेवी होळकर"** यांची जयंती पोलीस अधिक्षक कार्यालयात साजरी करण्यात आली. **मा. श्रीकृष्ण कोकाटे**, पोलीस अधिक्षक नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली **मा. श्री अबिनाश कुमार**, अपर पोलीस अधीक्षक नांदेड यांनी प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या प्रसंगी **श्री नामदेव रिठठे**, पोनि कल्याण, **श्री शंकर डेडवाल**, सपोनि तथा जनसंपर्क अधिकारी, नांदेड यांचेसह पोलीस अधिक्षक कार्यालयातील सर्व विभागाचे पोलीस अधिकारी आणि पोलीस अंमलदार व मंत्रालयीन कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित राहुन **"अहिल्यादेवी होळकर"** यांना अभिवादन केले. सदर कार्यक्रमाचे आयोजन, **सपोउपनि/श्री सुर्यभान कागणे, पोकॉ/मारोती कांबळे, विनोद भंडारे**, यांनी चांगल्या प्रकारे केले आहे.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड



# प्रेसनोट

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 193/2024 दिनांक : 31.05.2024

## नांदेड पोलीस दलातील पोलीस अधिकारी, व पोलीस अंमलदार सेवानिवृत्त...

नांदेड पोलीस दलातील एक पोलीस निरीक्षक, दोन ग्रेड पोलीस उप–निरीक्षक व नऊ पोलीस अंमलदार असे एकुण बारा जण नियत वयोमानानुसार दिनांक 31.05.2024 रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. **मा. श्रीकृष्ण कोकाटे,** पोलीस अधिक्षक नांदेड यांचे मार्गदर्शनाखाली **मा. श्री आबिनाश कुमार,** अपर पोलीस अधीक्षक नांदेड, **मा. श्रीमती डॉ. अश्विनी जगताप,** पोलीस उप–अधीक्षक(मु), हस्ते आज दिनांक 31/05/2024 रोजी सर्व सेवानिवृत्तांचा पुष्पगुच्छ, शाल श्रीफळ व भेट वस्तु देवुन सत्कार करण्यात आला. सर्व सेवानिवृतानी आपल्या कुटूंबाकडे वेळ द्यावा आणि आरोग्यांची काळजी घेवुन सुखी आणि आनंदी जिवन जगण्याचा सल्ला दिला. सदर कार्यक्रम मंथन हॉल पोलीस अधिक्षक कार्यालय नांदेड येथे पार पडला. सदर सेवानिवृत्त समारंभास. **मा. श्री आबिनाश कुमार,** अपर पोलीस अधिक्षक नांदेड, **मा. श्रीमती डॉ. अश्विनी जगताप**, पोलीस उप–अधिक्षक (मु), **श्री नामदेव रिठठे**, पोनि कल्याण, इतर पोलीस अधिकारी व अंमलदार मोठया संख्येने हजर होते. सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन **सपोउपनि श्री विठ्ठल कत्ते**, यांनी केले असुन, **मपोकॉ राखी कसबे**, पोलीस कल्याण यांनी कार्यक्रमाचे आयोजन उत्तम प्रकारे केले आहे.

| अ.क्र. | हुद्दा | सेविनिवृत्त अंमलदाराचे नाव | नेमणुक |
|---|---|---|---|
| 01 | पोलीस निरीक्षक | गणेश माणिकराव सोंडारे | जि.वि.शा नांदेड |
| 02 | ग्रेडपोउपनि | रामप्रभु दगडु राठोड | पोस्टे ईस्लापुर |
| 03 | ग्रेडपोउपनि | मनोहर भगवाना जाधव | गु. सु. प. नांदेड |
| 04 | सपोउपनि | अंकुश धनाजी लुंगारे | पोस्टे इस्लापुर |
| 05 | सपोउपनि | रावसाहेब शेषेराव घुगे | पोस्टे शिवाजीनगर |
| 06 | सपोउपनि | विनायक मुगाजी पवार | पोलीस मुख्यालय नांदेड |
| 07 | सपोउपनि | नंदकुमार मारोतराव पतंगे | पोलीस मुख्यालय नांदेड |
| 08 | पोहेकॉ | सुभाष बाजीराव बनसोडे | शवाशा |
| 09 | पोहेकॉ | भगवानसिंग नरसिंग ठाकुर | पोस्टे नांदेड ग्रामीण |
| 10 | पोहेकॉ | दशरथ बुडगीराम काळे | पोलीस मुख्यालय नांदेड |
| 11 | पोहेकॉ | रामरेडी भिमरेडी अलगेकर | पोलीस मुख्यालय नांदेड |
| 12 | पोकॉ | सुर्यकांत विश्वनाथ खेडकर | पोस्टे शिवाजीनगर |

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड

